**नियमित फौजदारी केस नं. ८४/२०२३**
**नि. क्र. २३**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – अजित मनोहर जाधव,

**वय**– ३८ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**राहणार** – साखरपा, जाधववाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. मी साखरपा, जाधववाडी येथे राहतो. आमच्या वाडीत रत्नागिरी–कोल्हापुर महामार्गालगत सती माता मंदीर आहे. त्या मंदीराची देखभाल आमच्या वाडीतील पाच मानकरी करतात.

**०२**. दिनांक १७/०७/२०२३ रोजी मी माझ्या घरी असताना संध्याकाळी ०७:०० – ०७:१५ वाजताच्या सुमारास आमच्या त्या मंदीराचे एक मानकरी कुमार काशीराम जाधव हे माझ्या घरी आले. त्यांच्या सोबत इतर ०४–०५ लोक होते. मी त्यांच्याजवळ गेलो. त्यावेळी कुमार काशीराम जाधव यांनी आमच्या त्या मंदीरातील ०२ सीसीटीव्ही कॅमेराज चोरी झाल्याचे आम्हाला सांगितले. ते कॅमेराज आम्ही साधारण ०६ महिने अगोदर लोक वर्गणीतून बसविलेले होते. त्यापैकी ०१ कॅमेरा मंदीराच्या समोरील बाहेरील बाजूस व दुसरा कॅमेरा मंदीरातील आतील बाजूस होता.

**०३**. याबाबत दिनांक २६/०७/२०२३ रोजी साखरपा पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यात आली.

**०४**. त्यानंतर पोलीस आमच्याकडे चौकशीला आले होते. पोलीसांनी मंदीरामध्ये माझ्याकडे चौकशी केली. कॅमेराज कोठे लावलेले होते याबाबत त्यांनी चौकशी केली. त्यावेळी माझ्यासोबत मंदीराचे मानकरी निलेश जगन्नाथ जाधव, कुमार कशीराम जाधव हे सुध्दा होते. तेथे चोरी झालेल्या कॅमेराजबाबत पोलीसांनी अर्ज लिहून

पोलीसांनी त्यावर आमच्या सहया घेतल्या. मी त्यावर वाचून सही केली होती. तो अर्ज मला दाखविल्यास मी तो ओळखू शकेल. मला आता दाखविण्यात आलेला अर्ज तोच आहे (साक्षीदारास दिनांक २८/०७/२०२३ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दर्शविण्यात आला आहे). त्या अर्जावर माझी सही नाही. त्या अर्जावर कुमार काशीराम जाधव यांची सही आहे. त्यांची सही करण्याची पध्दत म्हणजे नाव लिहिण्यासारखी आहे त्यामुळे मी त्यांची सही ओळखली. निलेश जगन्नाथ जाधव याची सुध्दा त्या अर्जावर सही आहे. निलेश याने माझ्यासमक्ष कामानिमीत्त सहया केलेल्या आहेत. त्यामुळे मी निलेश याची सही ओळखू शकतो (साक्षीदाराने निलेश जाधव यांची म्हणून नमूद केलेल्या **स्वाक्षरीस निशाणी २४** देण्यात आली. तसेच साक्षीदाराने कुमार काशीराम जाधव यांची म्हणून नमूद केलेल्या **सहीला निशाणी २५** देण्यात आली). त्यातील मजकूर वस्तूस्थीतीप्रमाणे आहे (सदर **पंचनाम्यास निशाणी २६** देण्यात आली). तेथे अर्ज लिहिण्या व्यतीरीक्त पोलीसांनी काही केले नव्हते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपींतर्फे वकील श्री. एस. एस. शेख यांच्याकडून –**

**०५**. हे म्हणणे खरे नाही की, नि. २६ कडील घटनास्थळ पंचनाम्यावर करण्यात आलेल्या सहया माझ्यासमक्ष करण्यात आलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला दिशा समजत नाहीत. मला अशांस व रेखांश समजत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी कुमार जाधव यांनी मला आता दाखविण्यात आलेली निशाणी २५ कडील सही पोलीस ठाण्यात जावून केली.

**०६**. पोलीस ठाण्यात ०५ माणसे गेली होती. ती ०५ माणसे एकदाच पोलीस ठाण्यात गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आम्ही पोलीसांच्या म्हणण्याप्रमाणे सही केली.

**०७.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.11 18:00:28 +0530

**(ब. द. तारे)**

**दिनांक ११/०२/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date | :- | 11/02/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 11/02/2025 |
| evidence uploaded on | :- | 11/02/2025 |